जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १८३ दिनांक - २५/०३/२०२४**

सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर

**अल्पवयीन मुलांना गाडी चालविणेसाठी देणा-या पालकांविरुध्द येथे गुन्हा**

दि २५/०३/२०२४ रोजी मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ३ पुणे श्री. संभाजी कदम यांचे आदेशानुसार धुलिवंदन सणानिमीत्त तुकाई नगर सर्कल सिंहगड कॉलेज रोड पुणे येथे नाकाबंदी लावण्यात आली होती. नाकाबंदी दरम्यान दोन अल्पवयीन मुले त्यांचे ताब्यातील मोटरसायकल चालविताना मिळुन आल्याने त्यांचेकडे विचारपुस केली असता दोघांकडे वाहन चालविण्याचा परवाना नसल्याचे व दोघेही अल्पवयीन असल्याचे दिसुन आले. दोन्ही अल्पवयीन मुलांना मोटरसायकल चालविणेसाठी ताब्यात देणारे त्यांचे पालक/गाडीचे मालक यांना मुले अल्पवयीन असल्याचे माहीत असताना सुध्दा त्यांचे नावावरील व ताब्यातील वाहने अल्पवयीन मुलांना चालविणेसाठी दिलेने पोलीस अंमलदार श्रावण शेवाळे यांनी दिले तक्रारीवरुन **सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे मोटार वाहन कायदा सन १९८८ चे कमल ३,५,१९९ (अ) अन्वये दि. २५/०४/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

सदर गुन्हयातील वाहने जप्त करण्यात आलेली असुन मोटार वाहन कायदयातील तरतुदीनुसार अल्पवयीन मुलांना त्यांचे वयाचे २५ वर्षापर्यंत वाहन चालविण्याचा परवाना मंजुर करु नये याकरीता प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांना पत्र देण्यात आले आहे. मोटार वाहन कायदयातील तरतुदीनुसार जप्त करण्यात आलेल्या वाहनांचा परवाना एक वर्षासाठी रद्द करणेकामी प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांना पत्र देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त, परि- ३ पुणे श्री. संभाजी कदम, मा.सहा.पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग, पुणे, श्री. भिमराव टेळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे श्री. विजय कुंभार, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक, सुरेश जायभाय, पोलीस अंमलदार श्रावण शेवाळे, दिपक गबदुले, होमगार्ड सोनवणे यांनी केली आहे.

**तरी पालकांनी आपले अल्पवयीन पाल्यांना अगर वाहनाचे मालकांनी आपले वाहन अल्पवयीन मुलांना तसेच वाहन चालविण्याचा परवाना नसताना वाहन चालविणेकरीता ताब्यात देवु नये असे पोलीस विभागातर्फे आवाहन करण्यात येत आहे. अन्यथा वरीलप्रमाणे कायदेशीर कारवाई करुन वाहने जप्त करुन पुढील कारवाई करण्यात येईल.**